**प्रेस नोट** **दिनांक ११/०४/२०२१**

**पनवेल शहर पोलीस स्टेशन,नवी मुंबई**

**''मिक्स ईन्डस्ट्रीयल हायड्रोकेमीकल ऑईलची''चोरी करुन अपहार करणारे ५ ट्रान्सपोर्टचे कंपनीचे मालकांना व १ चालकास अटक**

**४२,८०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त**

---

**थोडक्यात हकीकत:—**

फिर्यादी यांच्या हस्थी केमीकल, तळोजा कंपनीचा '' मिक्स इंडस्ट्रीयल हायड्रोकार्बन ऑईलचा'' टॅन्क सुनिल ट्रान्सपोर्टचे ट्रक क्र. एम.एच.४६.एफ ५२२८ वरील चालक प्रल्हाद गोरख गर्जे याचे ताब्यात पोहच करण्यासाठी दिला असता त्याने व त्याचे साथीदार यांनी आपसात संगणमत करून दिनांक ०९/०४/२०२१ रोजी रात्रौ ०१:३० वाजण्याचे सुमारास निलेश धाब्या जवळ,पळस्पे,पनवेल येथे सदर टॅन्कमधील ११,६००/— रूपये किंमतीचे अंदाजे २०० लीटर ऑईल चोरी करुन लोखंडी पिंपामध्ये काढुन अपहार केला होता. सदर ठिकाणी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी छापा मारला असता सदर आरोपीत हे पळुन गेले होते. म्हणुन फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन गु.रजि.नंबर I २१८/२०२१ भा.द.वि. कलम ४०७, ३४ प्रमाणे दिनांक ०९/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.पोलीस आयुक्त श्री.बीपिन कुमार सिंह, मा. पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. बी. जी. शेखर पाटील, मा. पोलीस उप आयुक्त श्री.शिवराज पाटील व मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री नितीन भोसले—पाटील यांनी विशेष प्रयत्न करुन आरोपी अटक करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

**गुन्हयाची उकल :—**

मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने वपोनि श्री.अजयकुमार लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीत चालक प्रल्हाद गोरख गर्जे व त्याचे पाच साथीदार (ट्रान्सपोर्ट मालक) यांना दि. १०/०४/०२१ रोजी अटक केली आहे.

**गुन्हयाची पध्दत :—**

अटक आरोपीत हे वेगवेगळया ५ ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक असुन त्यांच्या कोणात्याही ट्रान्सपोर्ट कंपनीला ''मिक्स इंडस्ट्रीयल हायड्रोकार्बन ऑईलचा'' टॅन्क पोहोच करण्यासाठी भाडे मिळाल्यास सदर आरोपीत ''मिक्स इंडस्ट्रीयल हायड्रोकार्बन ऑईल'' टॅन्कचे सिल न तोडता सिलचे बाजुलचे नट बोल्ट पान्याने खोलुन झाकण ओपन करुन त्यामध्ये पाईप टाकुन सदर ऑईलची चोरी करतात व आप आपसात ऑईल वाटुन घेतात. सदर ऑईल त्यांचे ट्रान्सपोर्टचे ट्रकमध्ये इंधन म्हणुन वापरतात. सदर ऑईल टॅन्कचे वजन मॅनेज करण्याठी जेवढे ऑईल चोरी केले तेवढे पाणी मिक्स करतात असे तपासात निष्पन्न झाले आहे.

**तपास अधिकारी — सुनिल तारमळे, पोलीस उप निरीक्षक**

**अटक आरोपींची नावे**

१) प्रल्हाद गोरख गर्जे, वय ३६, धंदा—चालक सुनिल ट्रान्सपोट

२) सुनिल महादेव वनवे, वय ३० वर्ष, धंदा— मालक सुनिल ट्रान्सपोर्ट,नवीन पनवेल

३) संपत गोरख पालवे, वय ३३ वर्ष, धंदा—मालक प्रथमेश ट्रान्सपोर्ट, पनवेल.

४) शिवाजी महादेव इंगवले, वय ३५वर्षे धंदा—मालक शुभम ट्रान्सपोर्ट, नवीन पनवेल.

५) काकासाहेब भिमराव नागरगोजे, वय ३६ वर्षे, धंदा—मालक दिपक ट्रान्सलाईन्स, नवीन पनवेल

६) शाहदेव उर्फे बापु सुखदेव पालवे, वय ४४ वर्ष, धंदा मालक—विशाल ट्रान्सपोर्ट, कामोठे.

वरील अटक आरोपींना दि. १५/०४/२०२१ पावेतो पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे.

**हस्तगत माल.**

१)२४,८८,४००/—रू. किचा ट्रक क्र.एम.एच.४६.एफ ५२२८ त्यावर मिक्स इंडस्ट्रीयल हायड्रोकार्बन ऑईलचा टॅन्क

२) ११,६००/—रू.किंचे एक लोखंडी पिंप त्यामध्ये अंदाजे २०० लीटर मिक्स इंडस्ट्रीयल हायड्रोकार्बन ऑईल.

३) ३,०००/— रू. किचा १ प्लास्टीक पाईप, ३ पाने, ४ लोखंडी पिंप.

४) ८,००,०००/— रू.किं.ची पांढ—या रंगाची ब्रिझा कार क्रमांक एम एच १२ पी एफ ०१२१

५) ८,००,०००/— रू.किं.ची रू.किं.ची ग्रे रंगाची ब्रिझा कार क्रमांक एम एच ४७ क्यु ८३१६

६) ५०,०००/— रू.किं.ची काळया रंगाची सी बी शाईन मोटार सायकल क्र. एम एच ०३ बी एम ९९५५

७) ५०,०००/— रू.किं.चीकाळया रंगाची बजाज डिसकव्हर मोटार सायकल क्र. एम एच २३ ए ए ४६७९

८) ७७,०००/— रू.किं.चे ६ मोबाईल फोन

---

४२,८०,०००/— एकुण

**कारवाई पथक :—**

सदरची कारवाई पनवेल शहर पोलीस ठाणेचे वपोनि अजयकुमार लांडगे व पोनि (गुन्हे) संजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि अनिल देवळे, पोउपनि सुनिल तारमळे, पोहवा रविंद्र राऊत, पोहवा नितीन वाघमारे, पोना परेश म्हात्रे, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि विवेक पारासुर, पोशि यादवराव घुले, पोना विनोद पाटील, पोना पंकज पवार, पोना गणेश चौधरी व पोशि साळुंखे यांनी केली आहे.